**स्पेशल केस नं.३१/ २०२३**

**निशाणी ४९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची जबानी**

**मी, सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नांव | - विष्णु राधाकृष्ण गायकवाड |
| वय | - ६८वर्ष |
| व्यवसाय | - सेवानिवृत्त |
| राहणार | -हनुमान टाकळी ता. पाथर्डी जि. अहमदनगर |

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे ए.डी.ढगे वकील</u>**

१. सन २०२० मध्ये मी, माझे पत्नी, मुलगा योगेश, सुन व नातु असे एकत्र कुटुंबात रहात होतो. विठठल गायकवाड माझा पुतण्या आहे. तो जन्मापासुन अपंग आहे. दि. १५.०५.२०२० रोजी सकाळी ९ वाजता मी माझे घरात होतो. त्यावेळी मला शिवीगाळ व ओरडण्याचा आवाल आला. त्यामुळे मी व मुलगा योगेश घराबाहेर पळत गेलो. त्यावेळी चंद्रकांत गायकवाड हा विठठल गायकवाड यास मारहाण करीत होता. मी सोडवासोडव करीत होतो. त्यानंतर अनिकेत गायकवाड तिथे आला. अनिकेत गायकवाड याने शिवीगाळ केली व योगेश च्या हाताला चावा घेतला. चंद्रकांत गायकवाड व अनिकेत गायकवाड यांनी मला व मुलाला जिवे मारण्याची धमकी दिली व विठठल गायकवाड यांस म्हणाले की, लंगडया , दुसरे तंगडे मोडील या रस्त्याने जायचे नाही. तेथे गावकरी जमा झाले होते. त्यानंतर चंद्रकांत गायकवाड व अनिकेल गायकवाड तेथुन निघुन गेले. विठठल च्या पाठीला मार लागल्याने रक्त येत होते. म्हणुन आम्ही त्याला व मुलगा योगेश यांना तिसगांव येथे दवाखान्यात पाठविले. त्यांनतर विठठल ने घटनेची फिर्याद दिली. मी चंद्रकांत व अनिकेत यांना ओळखतो. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. आर.पी.शेलोत वकील</u>**

२. सन २०१८ मध्ये सेवानिवृत्ती नंतर मी हनुमान टाकळी येथे रहाणेस आलो. त्यापुर्वी मी

नोकरीच्या ठिकाणी रहात होतो. माझा मुलगा योगेश हा अहमदनगर येथे फायनान्स कंपनीत नोकरी करतो. तो नोकरीच्या ठिकाणी रोज जावुन येवुन करतो. आरोपी चंद्रकांत हा पत्रकार आहे. आरोपी अनिकेत हा नोकरी करतो. हनुमान टाकळी ते तिसगांव हे अंतर आठ ते नउ किलोमिटरचे आहे. तिसगांव ते पाथर्डी मधील अंतर सांगता येणार नाही. हनुमान टाकळी ते पाथर्डी हे अंतर पंधरा ते सोळा किलोमिटरचे आहे.

३. गट ६४/४/ई चे क्षेत्र बारा गुंठे आहे. हे क्षेत्र आमचे वडीलोंपार्जीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, या जमिनीचे वाटप झालेले नाही. वाटप कधी झाले हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, या जमिनीच्या पश्चीमेला हनुमान टाकळी ते वृध्देश्वर कारखाना हा रस्ता आहे. गट ६४/४/ई मध्ये चंद्रकांत याचे घर दक्षिण बाजुला असुन माझे घर उत्तर बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर व चंद्रकांत चे घर या मध्ये कुंपन नसुन दोन्ही घरामधील जागेतुन पाठीमागे जाता येते. चंद्रकांत चे घर व माझे घर या मधील रस्ता २०१८ पासुन आडवलेला आहे.

४. चंद्रकांत चे घर व माझे घर या मधील रस्त्याबाबत विठठल याने तहसिलदार यांचे कडे तक्रार केली होती. त्या तक्रारीचे काय झाले या बाबत मला माहिती नाही. त्या तक्रारीच्या अनुषंगाने हनुमान टाकळी येथे मंडळअधिकारी व तहसिलदार आले होते. मला दोन भाउ आहे. माझे मोठे भाउ आसाराम व लहान भाउ नवनाथ. हे मला सांगता येणार नाही की, माझा पुतण्या मुकुंद व इतर यांचे विरुध्द भारत गायकवाड याने पाथर्डी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुकुंद गायाकवाड यांनी शाहु गायकवाड यांचेकडुन गट नं. ६४/४/ई मधील १.५ गुंठा क्षेत्र विकत घेतलेले आहे. हे मला माहित नाही की, सदर खरेदीखत रदद होवुन मिळणेसाठी भारत गायकवाड यांनी तो दावा दाखल केलेला आहे. हे मला माहित नाही की, त्या दाव्यामध्ये चंद्रकांत गायकवाड यांनी भारत गायाकवाड यांचे बाजुन साक्ष दिलेली आहे.

५.   हे मला सांगता येणार नाही की, बलफे कुटुंब विठ्ठल  च्या आई कडुन आमच्या नात्यात आहे. बलफे कुटुंब आमचे नातेवाईक असु शकतात. विठ्ठल हा तिसगांव येथे लॅब चालवितो. तो अंदाजे पंधरा सोळा वर्षा पासुन लॅब चालवितो. विठ्ठल लॅब ला  जाणेसाठी लुना वापर करतो. तो एकटा जातो व एकटाच येतो. विठ्ठल साधारणतः  सकाळी ८.३० ते ८.४५ चे दरम्यान लॅबला जाणेसाठी निघतो.  हे म्हणणे  खरे आहे की, माझे व चंद्रकांत चे घर रोडला लागुन आहे. तसेच विठ्ठल चे घर आतमध्ये आहे.  हे म्हणणे  खरे नाही की, हनुमान टाकळी ते वृध्देश्वर कारखाना  या रस्त्यावरुन  आमचे घराकडे जाणा-या रस्त्याला थोडा चढ आहे.

६.   हे मला सांगता येणार नाही की, अनिकेत गायाकवाड हा तिसगांव येथे पतसंस्थे मध्ये नोकरी करतो.   हे म्हणणे  खरे नाही की, दि. १५.०५.२०२० रोजी विठ्ठल घरातुन रस्त्यावर येत असतांना घसरुन पडला व  त्याचे कंबरेला मार लागला.  हे म्हणणे  खरे नाही की, विठ्ठल तेथे पडल्याचे पाहुन  मी व मुलगा योगेश तेथे गेलो व योगेश विठ्ठलची लुना उचलत असताना त्याच्या हाताला विठ्ठलच्या लुनाचे हॅण्डल लागले.  हे म्हणणे  खरे आहे की, मी सरतपासणीत सांगितलेली घटना घडले नंतर मी विठ्ठल  व योगेश यांना पोलीस स्टेशनला पाठविले नाही.  हे म्हणणे  खरे आहे की, ते दोघेही स्वतः हुन तिसगांव येथे उपचारासाठी गेले.

७.   घटनेबाबत पोलीसांनी माझा जबाब घेतला होता.मी जबाब देताना पोलीसांना सांगितले नवहते की, चंद्रकांत व अनिकेत विठ्ठल गायकवाड यांस म्हणाले की, लंगडया , दुसरे तंगडे मोडील  या रस्त्याने जायचे नाही.  हे म्हणणे  खरे आहे की, सदर बाब मी आज पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे.  हे म्हणणे  खरे नाही की, सदर बाब मी जाणिवपुर्वक खोटी सांगत आहे. हे म्हणणे  खरे नाही की, सरतपासात सांगितल्या प्रमाणे  कोणतीही घटना घडलेली नाही.  हे

म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास पुर्ण .

श्रवणोत्तर स्विकृती,

(आर डी चव्हाण )
अति सत्र न्यायाधीश अहमदनगर

दिनांक ३०/०१/२०२६
अहमदनगर